# उल्हासनगर महानगरपालिका

**वैद्यकिय आरोग्य विभाग**
**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान**
**कंत्राटी पदभरती जाहीरात**

**दिनांक :- १३/०८/२०२५**

## -: कंत्राटी पदभरती जाहीरात :-

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम 15 वा वित्त आयोग अंतर्गत नागरी प्राथमिक आरोगय केंद्र, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रा करिता विविध संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने करार तत्वावर भरण्यात येत आहेत.

या पदभरती संदर्भातील जाहिरात, पदांची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, सामाजिक आरक्षण, अर्जाचा नमुना, तसेच संबंधित नियम, अटी व शर्ती उल्हासनगर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर www.umc.gov.in वर उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी जाहिरातीतील नमूद सूचनेनुसार अर्ज आंवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या स्वयंप्रमाणित प्रतींसह, दिनांक १३/०८/२०२५ ते दिनांक ०४/०९/२०२५ रोजीपर्यंत **(शासकीय सुट्टीचे दिवस वगळून)** फक्त ऑफलाइन पद्धतीने अर्ज वॉर रूम, दुसरा मजला, उल्हासनगर महानगरपालिका, **उल्हासनगर-३** येथे सादर करावेत.

(स्नेहा करपे)
**उप आयुक्त (वै.आ.वि.)**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# उल्हासनगर महानगरपालिका

**वैद्यकिय आरोग्य विभाग**

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान**

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग अंतर्गत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व नागरी आरोगय वर्धिनी केंद्राकरिता खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पद्दतीने करार तत्वावर खालील पदांसाठी अर्ज दिनांक १३/०८/२०२५ ते दिनांक ०४ /०९/२०२५ रोजीपर्यंत मागविण्यात येत आहेत.

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियाना अंतर्गत रिक्त पदे (NUHM)**

**(वेळ सकाळी ९.०० ते सांय. ५.०० वाजेपर्यंत)**

| अक्र | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | एपिडेमॉलोजिस्ट | १ | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health MCI/ MMC (तत्सम कौन्सिल कडील नोंदणी व नुतनीकरण अनिवार्य) | ३५०००/- | खुला - १ |
| २ | पब्लीक हेल्थ मॅनेजर | २ | Any Medical Graduate, MBBS/B.D.S./BAMS/BHMS/BUMS/ with MPH/MHA/MBA In Health Care Admistrator<br><br>(तत्सम कौन्सिल कडील नोंदणी व नुतनीकरण अनिवार्य) | ३२०००/- | अज-१,<br>खुला-१ |
| ३ | स्टाफ नर्स | २ | १२ th With GNM/B.sc Nursing (तत्सम कौन्सिल कडील नोंदणी व नुतनीकरण अनिवार्य) | २००००/- | विजाअ-१<br>इमाव-१ |
| ४ | आरोग्य सेविका | ७ | ANM<br>(तत्सम कौन्सिल कडील नोंदणी व नुतनीकरण अनिवार्य) | १८,०००/- | भजब-१<br>विमाप्र-१<br>खुला-५ |
| ५ | औषधनिर्माता | ३ | M.Pharma/<br>D. Pharma/<br>B. Pharma/<br>(तत्सम कौन्सिल कडील नोंदणी व नुतनीकरण अनिवार्य) | १७,०००/- | अज-१,<br>साशैमाप्र-१<br>खुला-१ |
| ६ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (NUHM) | १ | Bsc+ DMLT<br>(तत्सम कौन्सिल कडील नोंदणी व नुतनीकरण अनिवार्य) | १७,०००/- | साशैमाप्र-१ |

## १५ वा वित्ता आयोग अंतर्गत रिक्त पदे (Urban Health Wellness Centre)
## (वेळ सकाळी ८.०० ते सांय. ४.०० वाजेपर्यंत)

| अक्र | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स (स्त्री) | १४ | १२ th With GNM/B.sc Nurcing (तत्सम कौन्सिल कडील नोंदणी व नुतनीकरण अनिवार्य) | २००००/- | विजाअ -१, भजड-१, इमाव-५ आदुघ-३ खुला-४ |
| २ | स्टाफ नर्स (पुरूष) | २ | १२ th With GNM/B.sc Nurcing (तत्सम कौन्सिल कडील नोंदणी व नुतनीकरण अनिवार्य) | २००००/- | अजा-१, विजाअ -१, |
| ३ | बहुउद्देशिय कर्मचारी (MPW) (पुरूष) | २५ | 12th Pass in Science+ Sanitary Inspector Course | १८०००/- | अजा-३, अज-२, भजब-१, भजक- १, भजड-१, इमाव-५, आदुघ-३ खुला-९ |

## हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत रिक्त पदे (HBT)
## (वेळ दूपारी २.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत)

| अक्र | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स (स्त्री) | ४ | १२ th With GNM/B.sc Nursing (तत्सम कौन्सिल कडील नोंदणी व नुतनीकरण अनिवार्य) | २००००/- | अज-१, विजाअ -१, इमाव-१ साशैमाप्र-१ |
| २ | स्टाफ नर्स (पुरूष) | ०१ | १२ th With GNM/B.scNursing (तत्सम कौन्सिल कडील नोंदणी व नुतनीकरण अनिवार्य) | २००००/- | खुला- १ |
| ३ | बहुउद्देशिय कर्मचारी (MPW) (पुरूष) | ७ | 12th Pass in Science AND Sanitary Inspector Course (Government Recognized Institute) | १८०००/- | अज-१, विजाअ -१, इमाव-१, साशैमाप्र-१ ईडब्ल्यूएस-१ खुला-२ |

**अर्ज भरण्याबाबतच्या सुचना**

१. सर्व उमेदवारांनी खालील नमूद फार्म मध्येच अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.

२. उमेदवारांने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

३. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद जन्म तारीखच अर्जात नमूद करावी.

४. ज्या उमेदवाराना Grade System or CGPA/SGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी तसेच त्यांच्या विद्यापीठानुसार टक्केवारी काढण्याचे सुत्र अर्जामध्ये नमूद करावे. सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५. जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांका पर्यंत असणारे वय दिवस महिने व वर्ष अचूक नमुद करावे.

६. अर्जात उमेदवारांचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.

७. अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचुक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

९. पुर्ण भरलेल्या अर्जाची स्वसाक्षांकित प्रत व सर्व कागदपत्रे, उल्हासनगर महानगरपालिका, वॉर रूम, दुसरा मजला येथे (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) प्रत्यक्षात (By Hand) व कुरीअरने/ स्पीड पोस्टने दिनांक १३/०८/२०२५ ते दिनांक ०४/०९/२०२५ रोजीपर्यंत सादर करण्यात यावेत. दिलेल्या मुदतीनंतर सादर करण्यात येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. टपालाने /कुरीयरने सादर केलेले अर्ज विहित कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती:**

1. **पदाचा प्रकार व नियुक्ती कालावधी**
   १. वरील पदे ही केवळ कंत्राटी स्वरुपाची असून, त्यांची नियुक्ती दिनांक **२९/०६/२०२६** पर्यंत मर्यादित असेल.
   २. सदर पदे ही राज्य शासनाची नियमित पदे नसून, केवळ कंत्राटी स्वरुपातील असतील. उमेदवारांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्याचा, सेवा संरक्षण मिळवण्याचा अथवा नियमित सेवेचा कोणताही दावा करता येणार नाही.
   ३. ही पदे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातच असतील.

2. **पात्रता व शारीरिक स्थिती**
   १. उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा.
   २. उमेदवाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
   ३. अनुभव व उच्च शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
   ४. आवश्यक शैक्षणिक पात्रता नसल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

3. **मानधन व लाभ**
   १. नमूद मानधन हे *एकत्रित* असून, त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय नसतील.
   २. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना मानधन हे राज्यस्तरीय मार्गदर्शक सूचनांनुसार निश्चित केले जाईल.

4. **वयोमर्यादा**

१. सामान्य उमेदवारांसाठी किमान वय १८ वर्षे, कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे, मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील.

२. वैद्यकीय अधिकारी/विशेषतज्ञ पदासाठी वयोमर्यादा ७० वर्षे, तर जीएनएम, एएनएम, औषधनिर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, बहुउद्देशीय कर्मचारी यासाठी ६५ वर्षे राहील.

३. वयाच्या ६० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या उमेदवारांनी, शारीरिकदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र जिल्हा शल्यचिकितकांकडून घेऊन अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

5. **अर्ज व कागदपत्रे**

१. उमेदवाराने अर्ज करताना पदाचे नाव, सामाजिक आरक्षण व प्रवर्ग (उदा. अनुसूचित जाती/जमाती/इतर मागासवर्गीय) स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे.

२. एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करत असल्यास, प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

३. अर्जासोबत संबंधित कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र (रजिस्ट्रेशन) सादर करणे बंधनकारक राहील. बहुउद्देशीय कर्मचारी पदाव्यतिरिक्त सर्व पदांकरिता ही अट लागू आहे.

४. सर्व कागदपत्रे सद्य स्थितीत वैध असावीत. अपूर्ण/अवैध कागदपत्रांबाबत अर्ज अपात्र ठरेल.

५. अर्जामध्ये उमेदवारांनी अचूक मोबाईल क्रमांक, पत्ता व ईमेल आयडी नमूद करावा, जे भरती प्रक्रियेअखेरपर्यंत सुस्थितीत असावेत.

६. अर्ज अपूर्ण/अर्धवट असल्यास त्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

6. **आरक्षण व जात प्रमाणपत्रे**

१. आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी मान्यताप्राप्त जात प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२. जातीचे प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराला आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

7. **भरती प्रक्रिया व जाहिरात अधिकार**

१. जाहिरातीतील पदसंख्या, आरक्षण, दिनांक इत्यादी बाबतीत कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडे राहतील.

२. भरतीसंदर्भातील सर्व सूचना www.umc.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क केला जाणार नाही.

३. नियुक्तीच्या वेळी किंवा पूर्वी मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. कागदपत्रांमध्ये तफावत आढळल्यास, किंवा दबाव तंत्र वापरण्यात आल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

४. नियुक्तीच्या ७ दिवसांत उमेदवाराने संबंधित ठिकाणी हजर राहणे बंधनकारक राहील.

५. निवड झाल्यानंतर उमेदवाराने रु.१००/- चा करारनामा (बॉण्ड पेपरवर) अटी मान्य असल्याचे नमूद करून सादर करणे बंधनकारक राहील.

६. कंत्राटी कालावधीत उमेदवारास स्थानबदलाची मागणी करता येणार नाही.

७. पूर्वीच्या सरकारी सेवेतून सेवा निवृत्त उमेदवारांनी संबंधित तपशील (रूजू दिनांक, कार्यकाळ, पदनाम, निवृत्ती दिनांक, अंतिम वेतन, पेन्शन) अर्जात नमूद करणे आवश्यक आहे.

8. **प्रतीक्षा यादी व नियुक्ती**

१. भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वर्षभराच्या कालावधीत जर रिक्त पद निर्माण झाले, तर प्रतीक्षा यादीतील उमेदवारास नव्याने भरती प्रक्रिया न करता नियुक्ती दिली जाईल.

२. केंद्र/राज्य शासनाने पदे नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ समाप्त केली जाईल.

**निवड प्रक्रिया**

१) सदर पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या उमेदवारांच्या अर्जामधील गुणवत्तेनुसार/गुणांकन पध्दतीने निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. या संदर्भात सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

२) उमेदवाराची निवड करावयाची असल्यास शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गठित करण्यात आलेल्या समिती यांच्या मान्यतेने मा. सहायक संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि. २६/०७/२०२४ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:५ उमेदवारांची निवड गुणांकन पध्दतीने करण्यात येईल, उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी/पदविका परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण अतिरिक्त अर्हता विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

**गुणांकन पद्धती :-** एपिडेमियोलॉजिस्ट पब्लीक हेल्थ मॅनेजर,जीएनएम, एएनएम, औषधनिर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदांकरिता गुणांकन पद्धतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येईल.

| अक्र | विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|---|
| १ | पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = ६०*५०/१००= ३०) | ५० |
| २ | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २०प्रमाणे Proportion काढावे. (उदा. १. स्टाफ नर्स पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त B.Sc (Nursing) ही शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेद्वाराने अर्ज केला असल्यास उमेद्वारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्यास २०% प्रमाणे Proportion = ६०*२०/१००=१२ गुण) | २० |
| ३ | संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत १ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण | ३० गुण |
| | | | **एकुण १०० गुण** |

१) मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांचे जा. क राआसोमं मनुष्यबळ पदभरती/10670-11016/2023 दि. 27.04.2023 रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचनांनुसार गुणांकन पद्धतीने पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

२) गुणांकन पद्धतीनुसार भरण्यात येणाऱ्या पदांकरिता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येणार नाही.

**१५ वा वित्ता आयोग अंतर्गत अर्जदारांकरिता सर्वसाधारण सुचना**

१) १५ वा वित्ता आयोग अंतर्गत पदे ही राष्ट्रीय आरोग्य अभियानाशी संबधित नाही व भविष्यात सदर योजना अथवा कार्यक्रम बंद पडल्यास अथवा पदांना मंजूरी न मिळाल्यास त्यांना राष्ट्रीय आरोग्य अभियाना मध्ये सामावून घेण्याचा दावा करता येणार नाही.

२) १५ वा वित्ता आयोग अंतर्गत पदे दवाखाने जसेजसे कार्यान्वित होतील तसतसे नियुक्ती आदेश देण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.**

१. पुर्ण माहिती भरलेला फॉर्म
२. वयाचा पुरावा (१० वी गुणपत्रक)
३. शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
४. कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र
५. सद्याचे पासपोर्ट आकाराचे २ फोटो
६. आधारकार्ड
७. पॅनकार्ड
८. अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
९. राखीव संवर्गातील उमेदवारांनी जात प्रमाणपत्र
१०. आरक्षणाच्या पदासाठी जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.
११. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
१२. शासकीय/ निमशासकीय/खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव असलेस अनुभव प्रमाणपत्र.
१३. MS-CIT प्रमाणपत्र
१४.लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
१५.फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र
१६.अर्ज व आवश्यक कागदपत्रे एकाच लिफाफयात बंद करुन सादर करावे. सदर लिफाफयावर अर्ज केलेल्या महानगरपालिकेचे नाव, अर्जदाराचे नाव व पदाचे नाव नमूद करावे, महानगरपालिकेचे नाव नमूद न केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

(स्नेहा करपे)
**उप आयुक्त (वै.आ.वि.)**
**उल्हासनगर महानगरपालिका**